# University of Mumbai

Secretariat of Registrar,
Fort,
Mumbai – 400 032.

No. REG/ICD/2018-19/314

19th June, 2018.

परिपत्रक :

कुलगुरू, प्र--कुलगुरू, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या कार्यालयातील ईमेल ID वर अनेक ईमेल पत्र येत असतात व त्यावर कार्यवाही करण्यासाठी त्यांच्या स्वीय सहाय्यकांकडून सदर ईमेल संबंधित विभागास ईमेलद्वारे व छापील प्रत सुध्दा पाठविण्यात येते. परंतु बहुतांश ईमेल वर विभागातर्फे कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही, असे विद्यापीठ प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.

मा. कुलगुरूच्या आदेशावरुन सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, पर्यावरणाचा विचार करता तसेच प्रशासनात गतिमानता आणण्यासाठी यापुढे सदर ईमेल पत्र संबंधित विभागाला ईमेल द्वारेच पाठविण्यात येतील. छापील प्रत पाठविण्यात येणार नाही. संबंधित विभागाने आपल्या विभागाचा ईमेल तपासून योग्य ती कार्यवाही करावी व संबंधितांना कळवावे. त्याचप्रमाणे, प्रत्येक विभागप्रमुखांनी, संचालकांनी, अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी आपल्या विभागाचा ईमेल दिवसातून कमीतकमी ३ वेळा तपासावा व येणाऱ्या ईमेलचे निरसन करावे.

सदर परिपत्रक मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार निर्गमित करण्यात येत आहे

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

प्रति,
मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/संचालक, उपकुलसचिव, समकक्ष अधिकारी व सहाय्यक कुलसचिव